International Research Journal ISSN-0975-3486 VOL. I * ISSUE—6 RNI : RAJBIL/2009/30097

*शोधपत्र-राज्यशास्त्र*

March, 2010

# राजपदाची संकल्पना आणि शिवाजी महाराज

*** प्रा. डॉ. सर्जेराव शिंदे**

***राज्यशास्त्र विभाग प्रमुख, संभाजी महाविद्यालय, मुरुड, लातूर**

भारतामधील प्राचीन व मध्यकालीन कायदेतज्ञाच्या मते, राजपद या संस्थेचा उगम इश्वरनिर्मित आहे. मनुस्मृती सांगते की, इंद्र, अनिल, यम, अर्क, अग्नि, वरूण, चंद्र, कुबेर यांच्या शाश्वत अंशातून परमेश्वराने राजा निर्माण केला.[१] तर कृष्णदेवराय आमुक्तमाल्यदा ग्रंथात म्हणतो, 'राजाची निर्मिती प्रजापतीने केली.'[२] शिवाजीबद्दल सभासद बखरीत "जिजाई आऊ तिचे पोटी राजश्री शिवाजी राजे पुत्र होताच श्री शंभूमहादेव जागृती येऊन स्वप्न झाले की, 'आपणच अवतरलो आहे"[३] असा उल्लेख झाला आहे. भूषण कवीनेही 'शिव, विष्णू, इंद्र यांचा अवतार'[४] असे शिवाजी महाराजांचे वर्णन केले आहे. म्हणजे एकूणच राजपद हे ईश्वरनिर्मित उगमावर भर देणारे दिसून येते. शिवकालीन राजपदाची संकल्पना हा परंपरेनुसार चालत आलेल्या राजेशाहीचाच पण एक विकसीत भाग आहे. शिवकालीन राजपदाच्या संकल्पनेवर शुक्रनीतीचा प्रभाव असलेला दिसतो. शुकनीतीमध्ये राजा हा राजाचे मस्तक मानला आहे. याबाबतचा शुक्रनीतीमधील संदर्भ असा, ***स्वाम्यमात्य-सुहृत्कोश-राष्ट्र-दुर्गबलानिच।/सप्तांगमुच्यते राज्यं तंत्र मूर्धानृपः स्मृतः।।***[५]

म्हणजेच राजा, अमात्य, मित्र, कोश, राष्ट्र, दुर्ग आणि सैन्य ही राज्याची सात अंगे आहेत. त्यात राजा हे मस्तक होय. यानुसार राजा राज्याचे मस्तक मानल्यानंतर आजची राष्ट्राची संकल्पना तत्कालीन राजपद संकल्पनेला लागू पडणार नाही. त्यानुसार शुक्रनीतीमध्ये राज्याची मिमांसा पुढीलप्रमाणे केली आहे. ***स्थावरं जंगमंचापि राष्ट्रशब्देन गीयते।/ यस्याधीनं भवेद्यावत द्राष्टं तस्य वैभवेत।।***[६]

म्हणजेच काही भूमी (जमीन) व त्यावर असणारे निर्जिव पदार्थ व सजीव प्राणी मिळून राष्ट्र होते. जेवढ्या राष्ट्रावर एखाद्याने सत्ता स्थापन केली तेवढे राष्ट्र त्याच्या मालकीचे होते. तर चिटणीस बखरीमध्ये 'या उपरी राष्ट्र कशास म्हणावे त्याची लक्षणे करून सांगतो. संपूर्ण राज्याची अंगे यांची वृद्धी राष्ट्रापासून होती. राष्ट्र म्हणजे प्रजा होत."[७] असा उल्लेख आला आहे. राजपदाच्या निर्मितीबद्दल पाश्चिमात्य विचारसरणी असे म्हणते की, 'प्रजेने आपल्या रक्षणासाठी आपले सर्व हक्क राजाच्या स्वाधीन केले आणि जनता व सम्राट यांच्या सामाजिक करारातून (Social Contract) राजसत्ता उदयास आली.'[८] वरील सर्व बाबींचा विचार करता त्यात राजाकडे पाहण्याचा विशिष्ट दृष्टीकोन दिसून येतो. समर्थ रामदासांनीही महाराष्ट्र धर्म संकल्पना मांडली. त्यामध्ये शिवाजीच्या उदयापूर्वी महाराष्ट्रात जी स्थिती होती त्यामध्ये कसा बदल करावा यासंबंधीची सुचना दिसून येते. महाराष्ट्र धर्म याचा अर्थ महाराष्ट्रात असणा-या सर्वांचा धर्म असा त्याचा व्यापक अर्थ आहे.[९] म्हणजे शिवकालीन राजपदाच्या संकल्पनेकडे पाहात असताना एक बाब निर्विवादपणे सिद्ध होते ती म्हणजे प्राचीन काळातील राजांपेक्षा वेगळ्या अशा कोणत्याही गुणांची अपेक्षा नव्हती. तरीही राजाला देवतातुल्य मानले आहे. 'इंद्र ज्याप्रमाणे वृष्टी करतो तद्वत राजाने प्रजेचे मनोरथ पूर्ण करावेत; सुर्य आपल्या किरणांनी जलशोषण करून प्रकाश व जीवन देतो तसेच अल्पकारभार घेऊन राजाने प्रजेचे पालन करावे; वरूणाप्रमाणे राजाने दुष्टांना पाशबद्ध करावे. चंद्रदर्शनाने होतो तसा आनंद राजदर्शनाने प्रजेस व्हावा; राजाने अग्निची तेजस्विता दुष्टांचे शासन करताना दाखवावी; प्रजापालनात पृथ्वीची क्षमाशिलता राजाच्या ठिकाणी दिसून यावी.'[१०]

राजपद धारण करणा-या व्यक्तीच्या अंगी कोणते गुण व स्वभावविशेष असले पाहीजेत या संबंधीचा संदर्भ असा, ***अभिषक्तोऽनभिषक्तो नृपत्वं तु यदाप्नुयात।। / बुद्ध्याबलेन शौर्यण ततो नित्यमनुपालयेत। प्रजाः सर्वाः प्रतिदिनमच्छिद्रो दण्डधृक् सदा।।***[११] म्हणजेच बुद्धी, बल आणि शौर्य यांच्या योगाने एखाद्यास राजपद प्राप्त झाले तर त्याचा राज्याभिषेक झाला असो वा नसो, त्याने नीतीस अनुसरून राजदंड धारण करावा व प्रजेवर नेहमी निर्दोषपणे राज्य करावे. राज्याचे संरक्षण, चांगल्यांचे रक्षण, दुष्टांना शिक्षा, खजीन्याचे न्याय संवर्धन व न्यायदानाचे कामी निपक्षपातीपणा यांना पाच मोठे यज्ञ मानले गेले आहे.[१२] यावरून खरोखरच राजपद हे भव्यदिव्य होते व त्याची कर्तव्ये कठीण होती. संरक्षणाच्या कर्तव्यात दोन प्रकारांचा अंतर्भाव होतो. एक म्हणजे बाह्य आक्रमणापासून राज्याचे संरक्षण करणे आणि दुसरे म्हणजे अंतर्गत शांतता व सुव्यवस्था राखणे सदरील कर्तव्याचे पाच मोठे यज्ञ शिवकालीन राजपद पालन करीत असताना दिसतात. राजाच्या कर्तव्यामध्ये

सामाजिक सुव्यवस्था राखणे, लोकांच्या धर्माचे रक्षण करणे, न्यायदान करणे, लोकांच्या आर्थिक भरभराटीचे संवर्धन करणे व सार्वजनिक कामे हाती घेणे. ही कर्तव्यही अत्यंत महत्त्वाची होती. स्वराज्याच्या प्रदेशात शांतता-सुव्यवस्था राखून सभोवतालच्या काही प्रदेशातून चौथाई सरदेशमुखी वसूल करण्यावर समाधान मानण्यात येत असे. चोर लुटारू यांच्या पासून रक्षण करण्यात येत असे. मल्हार रामराव चिटणीस म्हणतात, 'चोर, लुटारू व वाटमारी करणाऱ्यांना शिवाजी महाराज फार कडक शिक्षा देत असत. कांही वेळा शिरच्छेदाचीही शिक्षा देण्यात येत असे. याजमुळे राष्ट्रात कोठेही चोरभय नाही, ऐसे जाले.'[१३] तसेच राज्यातील वेगवेगळ्या धर्मांना मिळणा-या राजाश्रयाच्याबाबतीत तर इतर राजापेक्षा शिवाजी राजाची कारकिर्द अधिक लक्ष वेधून घेते. राजाने जातपात, धर्म, गरीब-श्रीमंत असा भेदभाव न करता प्रजेचे पालन पोषण शिवकाळात जाणीवपूर्वक झालेले दिसून येते. राज्ययंत्रणेतील अधिका-याने मतभेद, लांगेबांधे, इर्षा, असूया, गर्व, अहंभाव इत्यादी दुर्गूण निर्माण होणार नाहीत याची खबरदारीही घेतलेली दिसून येते.[१४] छत्रपती या शब्दातही वरील भाव व्यक्त झालेला दिसून येतो.

अ) क्षत्रपती = मुलूखाचा अधिपती किंवा क्षत्रपाधिपती

ब) छत्रपती = प्रजेवर छत्र धारण करणारा, प्रजेचे संरक्षण करणारा, काळजी घेणारा, आश्रय देणारा स्वामी या अर्थाने[१५]

रामचंद्रपंत अमात्य आज्ञापत्रात म्हणतात, 'राजसत्तेने धुंद न होता आपल्या प्रजेच्या कल्याणाच्या संवर्धनाकरिता राजाने नेहमी प्रयत्न करावे.'[१६] या बाबीचे शिवकाळामध्ये जाणीवपूर्वक पालन होताना दिसते. राजाने कोणत्या पद्धतीने वागले म्हणजे त्यास मोक्ष प्राप्त होतो याबाबतीत असे म्हटले जाते, तो राजा स्वधर्माचे पालन करतो, प्रजेचे पालन करतो, सर्व प्रकारचे यज्ञ करणारा, शत्रूस जिंकणारा, दान देणारा, क्षमाशील, शूर, निस्पृही व वैराग्यशील राजा शेवटी मोक्षपदाला जातो.[१७] शिवाय कपटी अंतःकरणाचा, हिंसक, फसवा, लुच्चा, ढोंगी, लोभी विषयासक्त, कलहप्रीय, निचांची संगती धरणारा, स्वैर वृत्तीचा व नितीविहीन राजा शेवटी नाश पावतो.[१८] शास्त्रकारांनी तर कर्तव्यपालन न करणारा राजा राक्षसाचा वंशज मानला आहे. इतकेच नव्हे तर विशिष्ट परिस्थितीत अधर्मी राजाचा वध देखील धर्म्य मानला आहे. गुणहीन राजाचा त्याग करावा. अधर्मी राजा दंडहत असतो[१९] असे म्हटले आहे. विशिष्ट प्रकृतीच्या राजाचा वध करावा असा संदर्भ महाभारतात आढळून येतो.

***अरक्षितारं हर्तारं विलोप्तारमनायकम् ।/तं वै राजकलिं हन्यूः प्रजा संतप्त निर्घृणम् ।।/अहं वो रक्षितेत्युकत्वा यो न रक्षति क्षत्रियः ।/ तं संहत्य विहन्तव्यः श्वेव सोन्माद आतुरः ।।***[२०] म्हणजे प्रजेचे रक्षण न करणारा, तीची लूटमार करणारा, समाजाचे नेतृत्व करण्यास असमर्थ ठरलेला असा राजा प्रजेने संघटीत होवून कठोरपणाने वधावा (मारावा). 'मी प्रजेचे पालन करीन' असे वचन देवून जो क्षत्रिय प्रजेचे संरक्षण करीत नाही अशा राजास पिसाळलेला कुत्रा मारावा तसा (प्रजेने) निपटून काढावा. वरील विविध वैशिष्ट्यांवरून असे लक्षात येते की, वरीलपैकी शिवाजी राजाच्या अंगी जे चांगले गुण होते त्यामुळेच ते नावलौकीकास पात्र ठरून त्यांचे नाव सर्वतोमुखी झालेले दिसते. राजाने आपला प्रत्येक दिवस कसा घालवावा याबाबत शुक्रनीतीमधील संदर्भ असा, ***अहोरात्रं विभाज्यैव त्रिंशद्धिस्तु मुहूर्त कैः । / नयेत् कालं वृथा नैव नयत स्त्रीमद्यसेवनैः ।/ यत् काले ह्यूचितम् तत् कार्य द्रागशंकितम् । /काले वृष्टि सुपोषाय ह्यन्यथा सुविनाशिनी ।।***[२१] म्हणजेच 'दिवस आणि रात्र यांचा तीस मुहूर्ताचे विभाग करून तो काळ त्याने योग्य कामात घालवावा. स्त्रिया आणि मद्यसेवन यात रत होवून काळ फुकट दवडू नये अथवा व्यर्थ घालवू नये. ज्यावेळी जे उचित करावयाचे ठरविले असेल ते तत्काळ बेधडक करावे. उदा. योग्यवेळी झालेली वृष्टी धान्याच्या पोषणास व उलटपक्षी (कांहीवेळा) तीच विनाशास कारण होते. शुक्रनीतीमध्येच राजाच्या दृष्टीने निंद्य अशी तीन पापे सांगीतली आहेत. ती म्हणजे अ) मृगया ब) द्यूत क) मद्यपान ही होत.

**निष्कर्ष :-** शिवकालीन राजपद ही संकल्पना बहुतांशी प्राचीन धर्मग्रंथावर आधारीत दिसून येते. शिवाजी महाराजांनीही राजपद सांभाळत असताना जे जे कांही चांगले करून, संकटसमयी मदत करून प्रजेचे कल्याण करता येईल त्यात त्यांनी जास्तीत जास्त वेळ घालविली. एक यशस्वी राजा होण्यासाठी आवश्यक असणा-या सर्व गुणांचा समूह शिवाजी महाराजांकडे दिसून येतो. त्या गुणांचा पावलोपावली त्यांनी वापरही केला. त्यामुळेच प्रत्येक अवघड गोष्ट सवगड करणे त्यांना सहज शक्य झाले. म्हणूनच समर्थ रामदासांनी त्यांची 'यशवंत, किर्तीवंत, वरदवंत, पुण्यवंत, नीतीवंत, सामर्थ्यवंत, जाणता राजा।' या शब्दात केलेली थोरवी सार्थ ठरते.

## संदर्भ ग्रंथ

१. मनुस्मृती, ७:४, पृ. २१६. २. चिटणीस के.एन., (२००३) मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था, भाग-१, पूणे, पृ. ९३. ३. सभासद कृ.अ., सभासद बखर, पृ. २-३.४. चिटणीस के.एन., पूर्वोक्त ; पृ. ९३. ५.गायकवाड व इतर (१९९०) मराठेकालीन संस्था व विचार, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पृ. १५७. ६. कित्ता, पृ. १५७. ७. कित्ता, पृ. १५७. ८. कुलकर्णी श्री. रं. (१९९४) शिवकालीन राजनीती आणि रणनीती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृ. १३. ९. गायकवाड व इतर, पूर्वोक्त, पृ. १५७. १०. कुलकर्णी श्री.रं., पूर्वोक्त, पृ. १४. ११. गायकवाड व इतर, पूवोक्त, पृ. १५८ १२. चिटणीस के. एन., पूर्वोक्त, पृ. ९८ १३. कित्ता, पृ. ९९ १४. गवळी पी. ए. (१९९९), मराठ्यांचा इतिहास, कैलास पब्लीकेशन, औरंगाबाद, पृ. ९० १५. सोवनी अविनाश (१९९८), स्वराज्याचे छत्रपती आणि अष्टप्रधान, पूर्वा प्रकाशन,पूणे, पृ. ११ १६. अमात्य रामचंद्रपंत, आज्ञापत्र, पृ. ६८ १७. गायकवाड व इतर, पूर्वोक्त पृ. १५८. १८. कित्ता, पृ. १५८. १९. कुलकर्णी श्री. रं. पूर्वोक्त, पृ. १५ २०. महाभारत, अनु. ६१-३१, ३३ उधृत. कुलकर्णी श्री. रं., पूर्वोक्त पृ. २७ २१. गायकवाड व इतर, पूर्वोक्त, पृ. १५९.